ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ पुणें, बुधवार, ४ डिसेंबर, १९६३ अंक २१

## विविध माहिती

**अधिक अधिकाऱ्यांची आवश्यकता**—भारत सरकारच्या गृहखात्यानें आय. एस्. एस्. नौकरांच्या संख्येचा त्रैवार्षिक आढावा घेतला असतां असें आढळून आलें कीं ह्या नौकरांची संख्या देशाच्या गरजेच्या मानानें बरीच कमी झाली आहे. सध्यां ह्या श्रेणींतील नौकरांची संख्या २,२५० आहे; ती १५० नें वाढवून २,४०० करण्याची गरज भासत आहे. तीन वर्षांपूर्वी त्यांची संख्या १,८०० होती. ती तेव्हां सध्यां इतकी वाढविण्यांत आली.

**दिल्लीचा पाणीपुरवठा**—पंजाब सरकारनें दिल्लीला पिण्याचा पाणीपुरवठा करण्यासाठीं एक योजना तयार केली आहे. योजनेप्रमाणें भाक्रा धरणाचें पाणी दिल्लीला पुरविण्यांत यावयाचें असून तीसाठीं सुमारें २ कोटी रुपये खर्च येईल. पाणीपुरवठा करण्यासाठीं १०॥ मैल लांबीचा एक कालवा खोदण्यांत येणार आहे. कालव्याची सुरुवात कुरूक्षेत्राजवळ होईल. ह्या कालव्याचा उपयोग शेतीला पाणी देण्यासाठींहि होणार आहे.

**पांढऱ्या चित्त्यांची पैदास**—दिल्लीच्या प्राणिसंग्रहालयांतील चित्तीणीनें दोन पांढऱ्या रंगाच्या बच्चांना जन्म दिला आहे. चित्तीण स्वतः करड्या रंगाची असून ती मुळांत काश्मीरमधील आहे. काश्मीर विधिमंडळाच्या एका सभासदानें ती पं. नेहरू ह्यांना भेट म्हणून दिली होती. ह्या बच्च्यांच्या डोळ्यांच्या पापण्या काळ्या आहेत. बहुधा पापण्या पांढऱ्या असतात. रेवाच्या महाराजांनीं पट्टयाच्या पांढऱ्या वाघांची पैदास केलेली आहे. पांढऱ्या चित्त्यांची पैदास मात्र जगांत प्रथमच झालेली असावी.

**निलगिरी जिल्ह्यांत सोन्याचें खनिज**— निलगिरी जिल्ह्यांतील एका विभागांत अशुद्ध सोन्याच्या खाणी सांपडल्या आहेत. मद्रास राज्याच्या उद्योगमंत्र्यांनीं ही माहिती जाहीर केली आहे. भारताच्या भूस्तर खात्यातर्फे ह्या भागाची पहाणी करण्याचें काम १९६१ ते १९६३ पर्यंत करण्यांत आलें असतांना अशुद्ध सोन्याचे खडक सांपडले. ह्याबाबतचा अधिकृत अहवाल अद्याप यावयाचा आहे. परंतु खडकांतील सोन्याचें प्रमाण कमी आहे असें म्हणतात.

**दिल्लींत महाराष्ट्रसदन**—महाराष्ट्राच्या मंत्र्यांची अगर सरकारी अधिकाऱ्यांची कामानिमित्त दिल्लीस आल्यास रहाण्याची सोय व्हावी म्हणून महाराष्ट्र-सदन नांवाची इमारत बांधण्यांत आली आहे. इतर कांहीं राज्यांच्याहि अशाच इमारती आहेत. इमारत बांधण्यासाठीं ५.५ लाख रुपये खर्च आला असून तिची आंखणी राज्याच्या वास्तुशास्त्रज्ञानें केलेली आहे. इमारतींत सिनेमा दाखविण्यासाठीं अगर नाटकें करण्यासाठींहि छोटेसें प्रेक्षकगृहहि बांधण्यांत आलें आहे. शिवाय छोटेसें ग्रंथालयहि आहे.

**त्या योगायोगाचा अर्थ काय ?**—अमेरिकेचे अध्यक्ष प्रेसिडेंट केनेडी ह्यांचा अधिकारावर असतांना खून झाला. अधिकारावर असतांनाच मृत्युमुखीं पडलेल्या अमेरिकेच्या अध्यक्षांबाबत एक चमत्कारिक योगायोग दृष्टीस पडतो. वीस वर्षांच्या कालावधीनें निवडून आलेले आणि शून्य आंकडा शेवटीं असलेल्या वर्षीं मृत झालेल्या अध्यक्षांची परंपरा १८४० पासून सुरू झाली. प्रे. केनेडी ह्यांच्या मृत्यूनें ही परंपरा तशीच चाललेली आहे. अशा अध्यक्षांची यादी अशी आहे. १८४० : प्रे. हॅरिसन; १८६० : प्रे. अब्राहम लिंकन; १८८० : प्रे. जेम्स गारफील्ड; १९०० : प्रे. मॅकिन्ले; १९२० : प्रे. हार्डिंग; १९४० प्रे. रूझवेल्ट आणि १९६० प्रे. केनेडी.

**रशिआला अमेरिकन दारूहि पाहिजे ?** — रशिआंत व्होडका ह्या पिण्याच्या दारूचाहि तुटवडा भासत आहे. ही दारू तयार करण्यासाठीं रशिआ अमेरिकेकडून ५ कोटी पौंडांचें मद्यार्क मिळविणाऱ्या खटपटींत आहे. रशिअन सरकारनें एका अमेरिकन दारू गाळणाऱ्या कारखान्याकडे ३० हजार टन मद्यार्क मिळण्याबाबत विचारणा केली आहे.

**कोळशाच्या खाणींसाठीं यंत्रसामग्री**—कोळशाच्या खाणींत वापरण्यांत येणारी अनेक प्रकारची यंत्रसामग्री निर्माण करण्याच्या कारखान्याचें उद्घाटन दुर्गापूर येथें करण्यांत आलें. कारखान्याच्या उभारणीसाठीं ३५ कोटी रुपये भांडवल लागलें. कारखान्यांतून दरसाल सुमारें २५ कोटी रुपयांची यंत्रसामग्री तयार करण्यांत येईल. भारतामधील पोलादाच्या वाढत्या उत्पादनासाठीं कोळशाचें उत्पादनहि वाढविणें जरूरीचें आहे.

**दंडकारण्यांत पोलादाच्या कारखान्याची शक्यता** — राष्ट्रीय व्यावहारिक आर्थिक संशोधनमंडळानें दंडकारण्य विभागाची आर्थिक पहाणी केली आहे. मंडळाला असें आढळून आलें कीं, ह्या भागांत लोखंड व पोलादाचा कारखाना काढण्यास अनुकूल परिस्थिति आहे. त्याशिवाय चुनखडीचा दगड मोठ्या प्रमाणावर सांपडत असल्यानें २ लाख टन सिमेंट उत्पन्न करूं शकणारा कारखानाहि उभारता येण्यासारखा आहे.

**तुळशीपासून कापूर**—मद्रास सरकारनें आपल्या मालकीच्या कारखान्यांत तुळशीपासून कापूर तयार करण्यांत यश मिळविलें आहे. कांहीं रासायनिक गोळ्या वापरून हा कापूर जळतो चांगला, परंतु त्यामुळें धूर मात्र बराच होतो. निलगिरी जिल्ह्यांत ३०० एकरांत तुळशीची लागवड मद्रास सरकारच्या जंगलखात्यानें केली आहे. ही लागवड १ हजार एकरांपर्यंत वाढविण्यांत येणार आहे.

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार, ४ डिसेंबर, १९६३ | अंक २१

## विविध माहिती

**अधिक अधिकाऱ्यांची आवश्यकता**—भारत सरकारच्या गृहखात्यानें आय. एस्. एस्. नौकरांच्या संख्येचा त्रैवार्षिक आढावा घेतला असतां असें आढळून आलें कीं ह्या नौकरांची संख्या देशाच्या गरजेच्या मानानें बरीच कमी झाली आहे. सध्यां ह्या श्रेणींतील नौकरांची संख्या २,२५० आहे; ती १५० नें वाढवून २,४०० करण्याची गरज भासत आहे. तीन वर्षांपूर्वी त्यांची संख्या १,८०० होती. ती तेव्हां सध्यां इतकी वाढविण्यांत आली.

**दिल्लीचा पाणीपुरवठा**—पंजाब सरकारनें दिल्लीला पिण्याचा पाणीपुरवठा करण्यासाठी एक योजना तयार केली आहे. योजनेप्रमाणें भाक्रा धरणाचें पाणी दिल्लीला पुरविण्यांत यावयाचें असून तीसाठी सुमारें २ कोटी रुपये खर्च येईल. पाणीपुरवठा करण्यासाठी १०॥ मैल लांबीचा एक कालवा खोदण्यांत येणार आहे. कालव्याची सुरुवात कुरुक्षेत्राजवळ होईल. ह्या कालव्याचा उपयोग शेतीला पाणी देण्यासाठीहि होणार आहे.

**पांढऱ्या चित्त्यांची पैदास**—दिल्लीच्या प्राणिसंग्रहालयांतील चित्तीणीनें दोन पांढऱ्या रंगाच्या बचांना जन्म दिला आहे. चित्तीण स्वतः करड्या रंगाची असून ती मुळांत काश्मीरमधील आहे. काश्मीर विधिमंडळाच्या एका सभासदानें ती पं. नेहरू ह्यांना भेट म्हणून दिली होती. ह्या बच्च्यांच्या डोळ्यांच्या पापण्या काळ्या आहेत. बहुधा पापण्या पांढऱ्या असतात. रेवाच्या महाराजांनीं पट्ट्याच्या पांढऱ्या वाघांची पैदास केलेली आहे. पांढऱ्या चित्त्यांची पैदास मात्र जगांत प्रथमच झालेली असावी.

**निलगिरी जिल्ह्यांत सोन्याचें खनिज**— निलगिरी जिल्ह्यांतील एका विभागांत अशुद्ध सोन्याच्या खाणी सांपडल्या आहेत. मद्रास राज्याच्या उद्योगमंत्र्यांनीं ही माहिती जाहीर केली आहे. भारताच्या भूस्तर खात्यातर्फें ह्या भागाची पहाणी करण्याचें काम १९६१ ते १९६३ पर्यंत करण्यांत आलें असतांना अशुद्ध सोन्याचे खडक सांपडले. ह्याबाबतचा अधिकृत अहवाल अद्याप यावयाचा आहे. परंतु खडकांतील सोन्याचें प्रमाण कमी आहे असें म्हणतात.

**दिल्लींत महाराष्ट्रसदन**—महाराष्ट्राच्या मंत्र्यांची अगर सरकारी अधिकाऱ्यांची कामानिमित्त दिल्लीस आल्यास रहाण्याची सोय व्हावी म्हणून महाराष्ट्र-सदन नांवाची इमारत बांधण्यांत आली आहे. इतर कांहीं राज्यांच्याहि अशाच इमारती आहेत. इमारत बांधण्यासाठी ५·५ लाख रुपये खर्च आला असून तिची आखणी राज्याच्या वास्तुशास्त्रज्ञानें केलेली आहे. इमारतींत सिनेमा दाखविण्यासाठी अगर नाटकें करण्यासाठीहि छोटेसें प्रेक्षकगृहहि बांधण्यांत आलें आहे. शिवाय छोटेसें ग्रंथालयाहि आहे.

**त्या योगायोगाचा अर्थ काय ?**—अमेरिकेचे अध्यक्ष प्रेसिडेंट केनेडी ह्यांचा अधिकारावर असतांना खून झाला. अधिकारावर असतांनाच मृत्युमुखीं पडलेल्या अमेरिकेच्या अध्यक्षांबाबत एक चमत्कारिक योगायोग दृष्टीस पडतो. वीस वर्षांच्या कालावधीनें निवडून आलेले आणि शून्य आंकडा शेवटीं असलेल्या वर्षी मृत झालेल्या अध्यक्षांची परंपरा १८४० पासून सुरू झाली. प्रे. केनेडी ह्यांच्या मृत्यूनें ही परंपरा तशीच चाललेली आहे. अशा अध्यक्षांची यादी अशी आहे. १८४० : प्रे. हॅरिसन; १८६० : प्रे. अब्राहम लिंकन; १८८० : प्रे. जेम्स गारफील्ड; १९०० : प्रे. मॅकिन्ले; १९२० : प्रे. हार्डिंग; १९४० प्रे. रूझवेल्ट आणि १९६० प्रे. केनेडी.

**रशिआला अमेरिकन दारूहि पाहिजे ?** — रशिआंत व्होडका ह्या पिण्याच्या दारूचाहि तुटवडा भासत आहे. ही दारू तयार करण्यासाठी रशिआ अमेरिकेकडून ५ कोटी पौंडांचें मयार्क मिळविण्याच्या खटपटींत आहे. रशिअन सरकारनें एका अमेरिकन दारू गाळणाऱ्या कारखान्याकडे ३० हजार टन मयार्क मिळण्याबाबत विचारणा केली आहे.

**कोळशाच्या खाणीसाठीं यंत्रसामग्री**—कोळशाच्या खाणींत वापरण्यांत येणारी अनेक प्रकारची यंत्रसामग्री निर्माण करण्याच्या कारखान्याचें उद्घाटन दुर्गापूर येथें करण्यांत आलें. कारखान्याच्या उभारणीसाठी ३५ कोटी रुपये भांडवल लागलें. कारखान्यांतून दरसाल सुमारें २५ कोटी रुपयांची यंत्रसामग्री तयार करण्यांत येईल. भारतामधील पोलादाच्या वाढत्या उत्पादनासाठी कोळशाचें उत्पादनहि वाढविणें जरूरीचें आहे.

**दंडकारण्यांत पोलादाच्या कारखान्याची शक्यता** — राष्ट्रीय व्यावहारिक आर्थिक संशोधनमंडळानें दंडकारण्य विभागाची आर्थिक पहाणी केली आहे. मंडळाला असें आढळून आलें कीं, ह्या भागांत लोखंड व पोलादाचा कारखाना काढण्यास अनुकूल परिस्थिति आहे. त्याशिवाय चुनखडीचा दगड मोठ्या प्रमाणावर सांपडत असल्यानें २ लाख टन सिमेंट उत्पन्न करूं शकणारा कारखानाहि उभारता येण्यासारखा आहे.

**तुळशीपासून कापूर**—मद्रास सरकारनें आपल्या मालकीच्या कारखान्यांत तुळशीपासून कापूर तयार करण्यांत यश मिळविलें आहे. कांहीं रासायनिक गोळ्या वापरून हा कापूर जळतो चांगला, परंतु त्यामुळें धूर मात्र बराच होतो. निलगिरी जिल्ह्यांत ३०० एकरांत तुळशीची लागवड मद्रास सरकारच्या जंगलखात्यानें केली आहे. ही लागवड १ हजार एकरांपर्यंत वाढविण्यांत येणार आहे.

## अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन्सन ह्यांची भारताविषयीं आपुलकी

राष्ट्राध्यक्ष केनेडी यांच्याप्रमाणेंच राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांना भारताविषयीं अतिशय आपुलकी आहे. १९६१ सालीं उपराष्ट्राध्यक्ष श्री. जॉन्सन यांनीं भारतास भेट दिली, तेव्हां ते म्हणाले होते, "सर्व भारतीयांचें राहणीमान सुधारण्याच्या कार्यांत तुमच्या माननीय पुढाऱ्यांशीं सहकार्य करण्याची आमची इच्छा आहे. जगांतील तरुणांना शिक्षण मिळावें अशी आमची इच्छा आहे. सर्व लोकांना अधिक चांगल्या रोजंदाऱ्या मिळाव्यात, अधिक चांगलीं शेतीचीं यंत्रें उपलब्ध व्हावींत आणि सर्वांचें आरोग्य सुधारावें, अशी आमची इच्छा आहे. जे स्वार्थी आहेत आणि आपला नाश करूं पाहतात अशा लोकांपासून स्वतःचें संरक्षण करण्यासाठी आपण सामर्थ्यवान् असलें पाहिजे. आपल्या मुलांबाळांना शिक्षण देणें, हाच सरकारचा हेतु आहे हें आपण कधींहि विसरतां कामा नये. भारत व अमेरिका यांची मैत्री अधिकाअधिक दृढ होईल अशी मला खात्री आहे."

---

## कोळशाच्या वहातुकीची अधिक चांगली व्यवस्था

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील उद्दिष्टें साध्य करण्यासाठी लागणाऱ्या कोळशाची वहातूक अधिक कार्यक्षमतेनें करण्यासाठी काय करावें ह्यासंबंधीं सल्ला देण्यासाठी भारत सरकारनें जागतिक बँकेच्या तज्ज्ञांना पाचारण केलें होतें. तज्ज्ञांनी केलेल्या पहाणीवरून असें दिसून आलें कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील कोळशाच्या वहातुकीची जबाबदारी पार पाडण्यासाठी हिंदी रेल्वेजना ४,००० डबेवजा वॅगन्स आणि १०० तेलावर चालणाऱ्या एंजिनांची जरूरी आहे. ह्या तज्ज्ञांच्या मतानें कोळशाची वहातूक नद्यांच्या अगर कालव्यांच्या मार्गानें होण्याची फारशी शक्यता नाहीं. भारतामधील रेल्वेवहातूक इतर प्रगत देशांच्या रेल्वे वहातुकी इतकीच कार्यक्षम आहे, असें मत तज्ज्ञांनीं व्यक्त केलें आहे.

---

## निर्यातीसाठी केळयांचें पीठ

कैरा जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघातर्फे चालविल्या जाणाऱ्या अमुल दूधवाडींत केळ्यांचें पीठ तयार करण्यांत आलें आहे. पीठ युरोपांतील देशांकडे निर्यात करण्यांत येणार आहे. युरोपीय देशांना ह्या पिठाचे नमुनेहि रवाना करण्यांत आले आहेत. केळ्यांच्या पिठाचा उपयोग आइस्क्रीमसाठी व इतर पदार्थ गोड बनविण्यासाठी करतां येतो.

---

## भारत-हंगेरी व्यापारी करार

भारताचे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन आणि हंगेरी ह्यांच्या दरम्यान व्यापारी करार करण्यांत आला आहे. ह्या कराराप्रमाणें हंगेरी भारताकडून ३७ लाख रुपये किंमतीच्या रोजखपाच्या वस्तू घेणार आहे. निर्यात करण्यांत येणाऱ्या वस्तूंत सुती व लोकरी कापड, विणलेल्या वस्तु, बूट, चपला, ह्यांचा समावेश आहे. त्याशिवाय १·१ लाख रुपयांच्या हस्तव्यवसायाच्या वस्तू आणि १·५ लाख रुपयांच्या कागदाच्या वस्तूहि निर्यात करण्यांत येणार आहेत.

## मिरज-मार्मगोवा रेल्वेमार्ग

मिरज-मार्मगोव्याच्या सध्यांच्या अरुंद रुळांच्या मार्गाचे रुंद रुळांच्या मार्गांत रूपांतर करण्यासाठी पहाणी करण्याचें रेल्वे खात्यानें ठरविलें आहे. होसपेट आणि लोंढा ह्यांच्यामधील रेल्वेमार्गाहि रुंद रुळांचा करण्यासाठी तांत्रिक पहाणी करण्यांत येणार आहे. वाढत्या वहातुकीसाठी हीं कामें जरूर झालीं आहेत.


दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ-पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर–**

| | |
|---|---|
| चालू ठेव ... ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज ... ... | ३ टक्के |

**कायम ठेव–**

| | |
|---|---|
| १ महिना ... ... | ३·३७ टक्के |
| ३ महिने ... ... | ३·५० टक्के |
| ६ महिने ... ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष ... ... | ४ टक्के |
| २ वर्षे ... ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर ... ... | ४·५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.



★ सहकाराच्या क्षेत्रांत केलेल्या कामगिरीचा महाराष्ट्राला अभिमान वाटतो ★

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

*सुद्धां आपल्या ५? वर्षांवरील सेवेचा अभिमान बाळगते.*

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल ... | ४ कोटी ५६ लाख |
| गंगाजळी व फंड ... | १ कोटी २६ लाख |
| ठेवी ... | ३० कोटी १३ लाख |
| खेळतें भांडवल ... | ६५ कोटी ६१ लाख |

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेंत वाढत्या प्रमाणांत ठेवी ठेवून राज्यांतील शेतकऱ्यांना सहाय्य करण्यास आम्हांला मदत करा.

निरनिराळ्या आकर्षक योजनांसाठी तुमच्या नजिकच्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या कोणत्याहि शाखेकडे चौकशी करा.

: मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई.
: प्रादेशिक कचेरी : महाल : नागपूर.

टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४

बृहन्मुंबईतील शाखा : (१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम

# अर्थ

बुधवार, ४ डिसेंबर, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत काय ?

भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यापासून धनहीनांचें दारिद्र्य कमी होण्याच्या ऐवजीं धनवान् मात्र अधिक श्रीमंत होत आहेत व झाले आहेत असें अनेकदां सांगण्यांत येतें. राजकीय पक्षांचे कार्यकर्ते ह्या वैषम्याचा उल्लेख नेहमींच करीत असतात. पण ह्या बाबतींत प्रत्यक्ष वस्तुस्थिति काय आहे ? संपत्तीचें व आर्थिक सत्तेचें केंद्रीकरण होत आहे असेंहि सांगण्यांत येत असतें. भारताच्या करव्यवस्थेंत संपत्तिकराला महत्त्वाचें स्थान आहे. ह्या कराबद्दल गोळा करण्यांत आलेले आंकडे अर्थपूर्ण असेच म्हणावे लागतील. १९६०–६१ आणि १९६१–६२ ह्या दोन वर्षांत संपत्तिकराची जी आकारणी करण्यांत आली ती बहुतांशीं २ लाख ते १२ लाख वट्ट संपत्तीच्या गटांतील करपात्र लोकांवर करण्यांत आली. १९६०–६१ सालीं संपत्तिकराला पात्र असलेल्या लोकांची संख्या २३,८१५ होती. त्यांपैकी २२,४०७ म्हणजे एकूण करपात्र लोकांच्या संख्येपैकी ९४ टक्के लोक २ लाख ते १२ लाख संपत्तीच्या गटांत मोडत होते. १२ लाखांपेक्षा अधिक वट्टसंपत्ति असलेल्या लोकांची संख्या १,४०८ एवढी होती. संपत्ति कराच्या कक्षेंत येणाऱ्या लोकांशीं त्यांचें प्रमाण ६ टक्के पडतें. संपत्तिकरासंबंधींच्या आंकड्यांवरून आणखी एक गोष्ट लक्षांत येते. कमी संपत्तीच्या गटांतील लोकांची संख्या वाढलेली दिसते आणि अधिक संपत्तीच्या गटांतील लोकांची संख्या कमी झालेली दिसते त्याचप्रमाणें दरडोई सरासरी संपत्तींतहि घट झालेली दिसते. आणखी एक अर्थपूर्ण प्रवृत्ति दिसून येते. संपत्तिकराच्या वसुलीमुळें ५० लाखांपेक्षा अधिक संपत्ति असलेल्या गटांतील करपात्र लोकांची संख्या झपाट्यानें घटत चाललेली आहे. १९६०–६१ सालीं अशा लोकांची संख्या १९१ होती ती १९६१–६२ सालीं १६५ वर आली आहे. त्यांच्या संख्येंत एका वर्षांत १४ टक्क्यांनीं घट झालेली दिसून येते.

सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूतर्फे प्राप्तिकराबाबत जी आंकडेवार माहिती गोळा करण्यांत आली आहे, तीवरून असें दिसतें कीं १९५६–५७ ते १९६१–६२ ह्या कालावधींत प्राप्तीवरील कर भरणाऱ्या कमी उत्पन्नाची संख्या वाढली आहे, इतकेंच नव्हे तर त्यांचें संकलित उत्पन्नहि वाढलें आहे. उलटपक्षीं, करपात्र मोठ्या उत्पन्नांची संख्या घटत चालली आहे. १५ हजार रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न नसलेल्या लोकांची संख्या १९५६–५७ सालीं ४,२२,३२८ होती. ती १९६१–६२ सालीं ८,३०,४४१ इतकी झाली. ही वाढ ९५ टक्के आहे. ह्याच कालावधींत करपात्र लोकांचे एकूण कर बसविलेलें उत्पन्न ७५ टक्क्यांनीं वाढलें. १९५६–५७ सालीं हें उत्पन्न २९४·९५ कोटी रुपये होतें. ते १९६१–६२ सालीं ५११·९६ कोटी रुपये झाले. उलटपक्षी २ लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या करपात्र उत्पन्नांच्या संख्येंत आणि एकूण उत्पन्नांच्या बेरजेंत बरीच घट झालेली आढळून येते. १९५६–५७ सालीं २ लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या करपात्र लोकांची संख्या ६५० होती. ती १९६१–६२ सालीं ५४३ पर्यंत खालीं घसरली. टक्केवारींत ही घट १६ टक्के भरते. ह्या करपात्र लोकांचें एकूण उत्पन्न १९५६ सालीं २७·०७ कोटी रुपये होतें तें १९६१–६२ सालीं २०·१० कोटी रुपयांपर्यंत घटलें. टक्केवारीच्या भाषेंत ही घट २६ टक्के इतकी भरते.

इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेपुढें केलेल्या भाषणांत श्री. के. के. बिर्ला ह्यांनीं वर दिलेल्या आंकडेवार माहितीचा उल्लेख केला. व त्यावरून असा निष्कर्ष काढला कीं हिंदमधील नागरिकांच्या उत्पन्नांतील तफावत निश्चितपणें कमी होत चालली असून श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालले आहेत, ह्या म्हणण्यांत तथ्यांश नाहीं.

---

## शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता

मुंबईजवळील ट्रॉंबे येथें संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फे खतविषयक परिषद् भरविण्यांत आली होती. परिषदेंत आशिआंतील आणि अतिपूर्व देशांतील खताच्या उद्योगधंद्याच्या विकासाबाबत विचार-विनिमय करण्यांत आला. दोन आठवडे चाललेल्या ह्या परिषदेचें उद्घाटन भारताचे पोलाद व भारी उद्योगधंद्याचे मंत्री श्री. सुब्रम्हण्यम् ह्यांनीं केलें. उद्घाटनाच्या भाषणांत ते म्हणाले कीं खताच्या उद्योगधंद्याचा विकास करण्यासाठी भारत सरकारनें कांहीं योजना हातीं घेतल्या आहेत. ह्या योजनेप्रमाणें चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारतांत दरसाल १५ ते २० लाख टन नत्रयुक्त खताचें उत्पादन होईल अशी अपेक्षा आहे. भारतामधील शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी खतांचा वापर मोठ्या प्रमाणावर झाला पाहिजे हें आतां सर्वमान्य झालेलें आहे. परंतु ह्या उद्योगधंद्यांत शेतकऱ्यानें जितकें लक्ष घालावयास पाहिजे तितके तो घालत नाहीं. म्हणून खताच्या उद्योगधंद्यांविषयीं शेतकऱ्यांत आस्था उत्पन्न करणें फार महत्त्वाचें आहे. आर्थिक भरभराट साधू पाहाणाऱ्या सर्वच देशांत एक कष्टदायक बाब सारखीच आढळून येतें. हे सर्वच देश औद्योगिक तंत्रज्ञ तयार करण्याकडेच आपलें सर्व लक्ष केंद्रित करीत आहेत. शेतीचे तंत्रज्ञ तयार करण्याकडे ते चुकून सुद्धां लक्ष देत नाहींत. वास्तविक औद्योगिक तंत्रज्ञाला प्रशिक्षणाची जितकी गरज आहे तितकीच आधुनिक पद्धतीनें शेती करणाऱ्या तंत्रज्ञालाहि आहे. शेतीच्या विभागांत नेत्रदीपक प्रगति करावयाची असेल तर असंख्य शेतकऱ्यांना शेतीच्या आधुनिक पद्धतीचें शिक्षण देऊन तयार केलें गेलें पाहिजे. खताच्या अधिक वापराच्या मार्गानें शेतकऱ्याला हें शिक्षण देतां येणें शक्य आहे. म्हणून ह्या उद्योगधंद्यांनें त्या कामीं पुढाकार घेतला पाहिजे.

---

## छोट्या उद्योगधंद्यांना कर्जे

गुजरात सरकारच्या स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशननें छोट्या उद्योगधंद्यांना देण्यांत यावयाचीं कर्जे सुलभ रीतीनें व लवकर देण्याची व्यवस्था केली आहे. ह्यापूर्वीं छोट्या उद्योगधंद्याला थेट कॉर्पोरेशनकडे कर्जासाठी अर्ज द्यावा लागे. आतां कांहीं अधिकृत बँकांकडे अर्ज करतां येतील. ह्या बँका कॉर्पोरेशनचे एजंटस् म्हणून काम पहातील. कॉर्पोरेशननें आतांपर्यंत १ कोटी रुपये कर्जाऊ दिलेले आहेत.

# अर्थ

बुधवार, ४ डिसेंबर, १९६३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद् वामन काळे


## श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत काय ?

भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यापासून धनहीनांचें दारिद्र्य कमी होण्याच्या ऐवजीं धनवान् मात्र अधिक श्रीमंत होत आहेत व झाले आहेत असें अनेकदां सांगण्यांत येतें. राजकीय पक्षांचे कार्यकर्ते ह्या वैषम्याचा उल्लेख नेहमींच करीत असतात. पण ह्या बाबतींत प्रत्यक्ष वस्तुस्थिति काय आहे ? संपत्तीचें व आर्थिक सत्तेचें केंद्रीकरण होत आहे असेंहि सांगण्यांत येत असतें. भारताच्या करव्यवस्थेंत संपत्तिकराला महत्त्वाचें स्थान आहे. ह्या कराबद्दल गोळा करण्यांत आलेले आंकडे अर्थपूर्ण असेंच म्हणावे लागतील. १९६०–६१ आणि १९६१–६२ ह्या दोन वर्षांत संपत्तिकराची जी आकारणी करण्यांत आली ती बहुतांशीं २ लाख ते १२ लाख वट्ट संपत्तीच्या गटांतील करपात्र लोकांवर करण्यांत आली. १९६०–६१ सालीं संपत्तिकराला पात्र असलेल्या लोकांची संख्या २३,८१५ होती. त्यांपैकीं २२,४०७ म्हणजे एकूण करपात्र लोकांच्या संख्येपैकीं ९४ टक्के लोक २ लाख ते १२ लाख संपत्तीच्या गटांत मोडत होते. १२ लाखांपेक्षा अधिक वट्टसंपत्ति असलेल्या लोकांची संख्या १,४०८ एवढी होती. संपत्ति कराच्या कक्षेंत येणाऱ्या लोकांशीं त्यांचें प्रमाण ६ टक्के पडतें. संपत्तिकरासंबंधींच्या आंकड्यांवरून आणखी एक गोष्ट लक्षांत येते. कमी संपत्तीच्या गटांतील लोकांची संख्या वाढलेली दिसते आणि अधिक संपत्तीच्या गटांतील लोकांची संख्या कमी झालेली दिसते त्याचप्रमाणें दरडोई सरासरी संपत्तींतहि घट झालेली दिसते. आणखी एक अर्थपूर्ण प्रवृत्ति दिसून येते. संपत्तिकराच्या वसुलीमुळें ५० लाखांपेक्षा अधिक संपत्ति असलेल्या गटांतील करपात्र लोकांची संख्या झपाट्यानें घटत चाललेली आहे. १९६०–६१ सालीं अशा लोकांची संख्या १९१ होती ती १९६१–६२ सालीं १६५ वर आली आहे. त्यांच्या संख्येंत एका वर्षांत १४ टक्क्यांनीं घट झालेली दिसून येते.

सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूतर्फे प्राप्तिकराबाबत जी आंकडेवार माहिती गोळा करण्यांत आली आहे, तीवरून असें दिसतें कीं १९५६–५७ ते १९६१–६२ ह्या कालावधींत प्राप्तीवरील कर भरणाऱ्या कमी उत्पन्नाची संख्या वाढली आहे, इतकेंच नव्हे तर त्यांचें संकलित उत्पन्नहि वाढलें आहे. उलटपक्षीं, करपात्र मोठ्या उत्पन्नांची संख्या घटत चालली आहे. १५ हजार रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न नसलेल्या लोकांची संख्या १९५६–५७ सालीं ४,२२,३२८ होती. ती १९६१–६२ सालीं ८,३०,४४१ इतकी झाली. ही वाढ ९५ टक्के आहे. ह्याच कालावधींत करपात्र लोकांचे एकूण कर बसविलेलें उत्पन्न ७५ टक्क्यांनीं वाढलें. १९५६–५७ सालीं हें उत्पन्न २९४·९५ कोटी रुपये होतें. ते १९६१–६२ सालीं ५११·९६ कोटी रुपये झाले. उलटपक्षीं २ लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या करपात्र उत्पन्नांच्या संख्येंत आणि एकूण उत्पन्नांच्या बेरजेंत बरीच घट झालेली आढळून येते. १९५६–५७ सालीं २ लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या करपात्र लोकांची संख्या ६५० होती. ती १९६१–६२ सालीं ५४३ पर्यंत खालीं घसरली. टक्केवारींत ही घट १६ टक्के भरते. ह्या करपात्र लोकांचें एकूण उत्पन्न १९५६ सालीं २७·०७ कोटी रुपये होतें तें १९६१–६२ सालीं २०·१० कोटी रुपयांपर्यंत घटलें. टक्केवारीच्या भाषेंत ही घट २६ टक्के इतकी भरते.

इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेपुढें केलेल्या भाषणांत श्री. के. के. बिर्ला ह्यांनीं वर दिलेल्या आंकडेवार माहितीचा उल्लेख केला. व त्यावरून असा निष्कर्ष काढला कीं हिंदमधील नागरिकांच्या उत्पन्नांतील तफावत निश्चितपणें कमी होत चालली असून श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालले आहेत, ह्या म्हणण्यांत तथ्यांश नाहीं.

## शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता

मुंबईजवळील ट्रॉंबे येथें संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फे खतविषयक परिषद् भरविण्यांत आली होती. परिषदेंत आशिआंतील आणि अतिपूर्व देशांतील खताच्या उद्योगधंद्याच्या विकासाबाबत विचारविनिमय करण्यांत आला. दोन आठवडे चाललेल्या ह्या परिषदेचें उद्घाटन भारताचे पोलाद व भारी उद्योगधंद्याचे मंत्री श्री. सुब्रम्हण्यम् ह्यांनीं केलें. उद्घाटनाच्या भाषणांत ते म्हणाले कीं खताच्या उद्योगधंद्याचा विकास करण्यासाठी भारत सरकारनें कांहीं योजना हातीं घेतल्या आहेत. ह्या योजनेप्रमाणें चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारतांत दरसाल १५ ते २० लाख टन नत्रयुक्त खताचें उत्पादन होईल अशी अपेक्षा आहे. भारतामधील शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी खतांचा वापर मोठ्या प्रमाणावर झाला पाहिजे हें आतां सर्वमान्य झालेलें आहे. परंतु ह्या उद्योगधंद्यांत शेतकऱ्यानें जितकें लक्ष घालावयास पाहिजे तितके तो घालत नाहीं. म्हणून खताच्या उद्योगधंद्यांविषयीं शेतकऱ्यांत आस्था उत्पन्न करणें फार महत्त्वाचें आहे. आर्थिक भरभराट साधूं पाहाणाऱ्या सर्वच देशांत एक कष्टदायक बाब सारखीच आढळून येतें. हे सर्वच देश औद्योगिक तंत्रज्ञ तयार करण्याकडेच आपलें सर्व लक्ष केंद्रित करीत आहेत. शेतीचे तंत्रज्ञ तयार करण्याकडे ते चुकून सुद्धां लक्ष देत नाहींत. वास्तविक औद्योगिक तंत्रज्ञाला प्रशिक्षणाची जितकी गरज आहे तितकीच आधुनिक पद्धतीनें शेती करणाऱ्या तंत्रज्ञालाहि आहे. शेतीच्या विभागांत नेत्रदीपक प्रगति करावयाची असेल तर असंख्य शेतकऱ्यांना शेतीच्या आधुनिक पद्धतींचें शिक्षण देऊन तयार केलें गेलें पाहिजे. खताच्या अधिक वापराच्या मार्गानें शेतकऱ्याला हें शिक्षण देतां येणें शक्य आहे. म्हणून ह्या उद्योगधंद्यानें त्या कामीं पुढाकार घेतला पाहिजे.

## छोट्या उद्योगधंद्यांना कर्जें

गुजरात सरकारच्या स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशननें छोट्या उद्योगधंद्यांना देण्यांत यावयाचीं कर्जें सुलभ रीतीनें व लवकर देण्याची व्यवस्था केली आहे. ह्यापूर्वी छोट्या उद्योगधंद्याला थेट कॉर्पोरेशनकडे कर्जासाठी अर्ज द्यावा लागे. आतां कांहीं अधिकृत बँकांकडे अर्ज करतां येतील. ह्या बँका कॉर्पोरेशनचे एजंटस् म्हणून काम पहातील. कॉर्पोरेशननें आतांपर्यंत १ कोटी रुपये कर्जाऊ दिलेले आहेत.

## सहकारी प्रक्रिया संस्थांना पत-पुरवठा
### भांडवली खर्चासाठी मध्यम मुदतीचें कर्ज देण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेनें ठरविलेलें धोरण

प्रक्रिया व्यवसाय राज्यांत बरेच जिल्ह्यांतून सुरू झाले तथापि उत्पादक आणि प्रक्रिया संस्था यांचा संबंध क्वचित जोडला गेला. या प्रक्रिया संस्थेचें कार्यक्षेत्र कागदावर ठरलें. त्या कार्यक्षेत्रांतील उत्पादकांवर माल पुरविण्याचें बंधन नसल्यानें सहकारी प्रक्रिया संस्थेच्याभोंवतीं कच्चा माल भरपूर पिकत असूनहि संस्थेला मात्र प्रक्रिया करण्यासाठी माल मिळत नाहीं, अशी विचित्र परिस्थिति दिसूं लागली. माल विकत घेण्यासाठी भरपूर पैसा जवळ पाहिजे. शिवाय माल विकत घेण्यानें भावांतील चढ–उताराचा धोका संस्थेस पत्करावा लागतो. या सर्व गोष्टी 'सहकारी उद्योग मंडळानें' विचारांत घेतल्या व सहकारी प्रक्रिया या संस्था शास्त्रशुद्ध पायावर उभ्या करण्यासाठी विशिष्ट धोरण आंखलें.

#### प्रक्रिया संस्थांचा सर्वसाधारण साचा

सहकारी प्रक्रिया संस्था या प्रामुख्यानें उत्पादकांच्या संस्था असल्या पाहिजेत. ज्या विभागांत प्रक्रिया व्यवसाय स्थापन करण्याची योजना आहे, त्या संस्थेनें आपलें कार्यक्षेत्र निश्चित करून या कार्यक्षेत्रांतील उत्पादक सभासदांनीं एकराच्या प्रमाणांत भांडवल उभें करण्याची तयारी दर्शविली पाहिजे. त्याचप्रमाणें उत्पादकांकडून संस्थेस माल पुरविण्यासाठी तो एकत्रित करून प्रक्रिया करण्यासाठी व त्याची सामुहिक विक्री करण्यासाठी करारनामे केले पाहिजेत. सर्वच क्षेत्रांतील उत्पादक सभासद ताबडतोब होतील असें म्हणणें नाहीं. तथापि अर्जमागणीचा अर्ज करण्यापूर्वी निदान ठरलेल्या क्षेत्रापैकी निम्म्याहून अधिक क्षेत्रांतील सभासद झालेले असले पाहिजेत व त्यांनीं एकराचे प्रमाणांत भाग घेतलेले असले पाहिजेत. सभासदांनीं प्रक्रियेसाठी आणलेल्या मालाच्या पोटीं जिल्हा बँकेमार्फत योग्य तो दुरावा ठेऊन उचल मिळूं शकते.

सहकारी उद्योग-मंडळानें प्रक्रिया संस्था शास्त्रशुद्ध तत्त्वावर उभारण्यासाठी एक सर्वसाधारण साचा मान्य केला आहे. सहकारी खात्यानेंहि या धोरणास मान्यता दिली आहे.:—

#### जिल्हा बँकेकडे प्रथम अर्ज

ठिकठिकाणच्या प्रक्रिया संस्थांनीं कर्जासाठी अर्ज आपल्या जिल्हा बँकेकडे प्रथम करावेत. जिल्हा बँकेला कर्ज देणें शक्य नसेल तर मग अर्ज इकडे पाठवावेत. सर्वच अर्ज इकडे येवूं नयेत म्हणून सर्वसाधारपणें असें ठरविलें आहे कीं, २५ हजार रुपयांपर्यंतचे भांडवली कर्जाचे अर्ज जिल्हा बँकेनें मंजूर करावे. त्यावरील रकमेचे अर्ज राज्य बँकेकडे पाठवावे. भांडवली खर्चासाठी कर्ज राज्य बँकेनें दिलें तरी खेळत्या भांडवलासाठी कर्ज जिल्हा बँकेनेंच द्यावयाचें आहे.

#### भांडवली खर्चाचा अंदाज

व्यवसायावरील भांडवली खर्चाचे आंकडे योजनापूर्वक व पूर्ण विचार करून दिलेले असावेत. जॉईंट रजिस्ट्रार (इंडस्ट्रियल सोसायटचा)अगर आर्किटेक्ट किंवा इंजीनियर यांनीं ते बरोबर असल्याचा दिलेला दाखला सोबत जोडला पाहिजे. नवीन यंत्रसामग्री खरेदी करावयाची ठरली असेल तर ती ज्या कंपनीकडून घेणार त्यांनीं दिलेल्या किंमतीच्या पत्राची प्रत सोबत जोडावी. यंत्रसामग्री जुनी असेल तर तिची किंमत योग्य असल्याबद्दलचा सरकारी अधिकाऱ्याचा दाखला घ्यावा लागेल.

#### कच्च्या मालाची निश्चितता

सहकारी प्रक्रिया संस्थेच्या कार्यक्षेत्रांत कच्चा माल गिरणी वर्षभर चालण्यास पुरेसा हवा. गिरणीचे कार्यक्षेत्रांतील गांवें, पिकाचें क्षेत्र, उत्पन्न याची सविस्तर माहिती द्यावी. बाजारांत माल किती येतो याची माहिती जोडावी.

#### सभासदांकडून मिळणारा माल

पत-पुरवठा व माल-विक्री यांची सांगड घालणें हा मुख्य हेतु प्रक्रिया संस्था स्थापन करण्यांत आहे यासाठी सभासदांचें क्षेत्र व त्यांचें भाग भांडवल यांची सांगड पोट नियमाद्वारें घातली पाहिजे. त्याचप्रमाणें सभासदांनीं आपला माल संस्थेस देण्याचा व तो एकत्रित करून प्रक्रिया करण्याबद्दल करारनामा करून दिला पाहिजे. सुरवातीस सर्व क्षेत्रांतील सभासद होतील असें म्हणणें नाहीं. तथापि अर्ज करतांना निदान ५० टक्क्यांहून अधिक क्षेत्रांतील उत्पादक सभासद नोंदलेले असावेत.

#### बँकेकडून किती कर्ज मिळूं शकेल

यंत्रसामग्री, इतर उपकरणें, जमीन, इमारती, यांच्या एकूण किमतीच्या ५० टक्केपर्यंत जास्तींत जास्त कर्ज बँकेमार्फत मिळूं शकेल. कर्जासाठी यंत्रसामग्री, जमीन, यांचें गहाणखत करून द्यावें लागेल. योजनेंतील एकूण रकमेपैकी ५० टक्के रक्कम संस्थेलाच उत्पादकांकडून भांडवल जमवून व सरकारकडून मिळणाऱ्या भांडवलाद्वारें उभारावी लागेल. स्वतःचें ५० टक्के भांडवल गोळा झाल्याशिवाय कर्जाची उचल करतां येणार नाहीं.

#### सभासदांचाहि माल विकत घ्यावयाचा नाहीं

माल खरेदी करण्यांत भावांतील चढउताराचा धोका असतो. हा धोक्याचा व्यवहार संस्थेला करतां येणार नाहीं. सभासदांनीं संस्थेला माल द्यावयाचा. सभासदांना मालापोटीं जास्तींत जास्त ७५ टक्केपेक्षा उचल देतां येणार नाहीं. उरलेली रक्कम वर्षाच्या शेवटीं सर्व हिशेब झाल्यावर दिली जाईल. सभासदाला प्रायमरी संस्थेचें जें कर्ज असेल, तें माल विकून आलेल्या रकमेंतून प्रथम द्यावयाचें आहे.

बँकेनें मंजूर केलेल्या कर्जाच्या कमींत कमी १ टक्का रकमेचे या बँकेचे भाग संस्थेनें प्रथम घेतले पाहिजेत. बँकेकडे आपले अहवाल वेळोवेळीं पाठविले पाहिजेत व बँकेचे अधिकारी तपासणीसाठी आले असतां त्यांना सर्वप्रकारचें सहकार्य दिलें पाहिजे.

कर्ज मंजूर झालें तरी कर्जाबरोबर येणाऱ्या अटींची पूर्तता करण्यास विलंब लागतो, त्यामुळें कर्ज हातांत पडत नाहीं व त्याचा प्रत्यक्ष फायदा मिळत नाहीं. तेव्हां अर्जाचा नमुना काळजीपूर्वक पाहावा. त्यासोबत जी माहिती जोडावयाची आहे त्या कागदपत्रांची यादीहि तपशीलवार दिली आहे. याशिवाय आणखी कांहीं खुलासा हवा असला तर सचिव, सहकारी उद्योगमंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई यांना सविस्तर पत्र लिहावें.

---

## १२८९ कंपन्यांचे, २० बँकांवर १४०२ डायरेक्टर्स
### बँकेचा प्रत्येक डायरेक्टर इतर आठ बोर्डांवर

१९६१ अखेरच्या ठेवींच्या आंकड्याप्रमाणें पहिल्या अनुक्रमाच्या २० बँकांचे बोर्डावर एकूण १८८ डायरेक्टर होते, आणि इतर १४०२ कंपन्यांच्या (सहकारी बँकासुद्धां) बोर्डांवर ते काम करीत होते. म्हणजे, सरासरीनें, बँकेचा प्रत्येक डायरेक्टर आठ इतर ठिकाणीं डायरेक्टर होता. त्यांतील १२८९ बिगर–बँक कंपन्यांपैकी ११६८ कंपन्यांचा प्रत्येकी एक एकच डायरेक्टर बँकांचा डायरेक्टर होता. ८८ कंपन्यांचे प्रत्येकी दोन डायरेक्टर बँकांचे डायरेक्टर होते, २५ कंपन्यांचे प्रत्येकी तीन डायरेक्टर बँकांचे डायरेक्टर होते, ७ कंपन्यांत प्रत्येकी चार डायरेक्टर बँकांचे डायरेक्टर होते आणि १ कंपनीचे पांच डायरेक्टर बँकांचे डायरेक्टर होते.

---

## बँक कौंटरवर चेकचे पैसे त्वरित मिळण्याची व्यवस्था
### टेलर पद्धतीचा अवलंब

ठेवी आकर्षण्यासाठी बँकांची एकमेकांत तीव्र स्पर्धा चालू आहे, परंतु पैशाची देवघेव काउंटरवरती सुलभ करण्याकडे बँकांचें फारसें लक्ष नाहीं, असें म्हणालें पाहिजे. कचेऱ्यांना आधुनिक स्वरूप देण्यासाठी रंगरंगोटी महत्त्वाची समजली जाते, पण गिऱ्हाइकांच्या व्यवहारांच्या सुलभतेला अग्रस्थान मिळत नाहीं. मोठाल्या शहरांतील बँकांतून गिऱ्हाइकांच्या रांगा उभ्या असतात.

कांहीं विदेशी बँका आणि त्याचप्रमाणें दि बँक ऑफ बरोडा व दि पंजाब नॅशनल बँक ह्यासारख्या हिंदी बँका, ह्यांनीं आपल्या कांहीं कचेऱ्यांतून 'टेलर' पद्धत सुरू केली आहे. त्यामुळें गिऱ्हाइकाला थोड्या मिनिटांतच रक्कम मिळूं शकते.

ही 'टेलर' पद्धत म्हणजे काय? बँकेच्या कॅशिअरला टेलर अशी संज्ञा आहे. चेक घेणारा, लेजरकीपर, पासिंग ऑफिसर आणि रक्कम देणारा कॅशिअर, ह्या सर्वांचीं कामें हा कॅशिअर करतो. अशा चेकची रक्कम मर्यादित असते. उदाहरणार्थ, पंजाब नॅशनल बँकेनें सेव्हिंग्ज बँक खात्यासाठी ही पद्धत १९६२ मध्यें कांहीं कचेऱ्यांतून सुरू केली, तेव्हां तिनें १,००० रु. ची मर्यादा ठरविली होती. ह्या पद्धतीचें वैशिष्ट्य म्हणजे चेक दाखल करतांच गिऱ्हाइकाला रोख रक्कम दिली जाते.

'टेलर'जवळ प्रत्येक गिऱ्हाइकाचें रेकॉर्ड कार्ड असतें. त्यावर खातेदाराची नमुन्याची सही, चेकबुकाचा सीरिअल नंबर, खात्यांतील अखेरची शिल्लक, हें सर्व दर्शविलेलें असतें. ह्या पद्धतीमुळें कांहीं धोका निर्माण झाला, तरी त्याची तरतूद विमा उतरून बँकेनें केलेली असते.

मुंबईमधील कांहीं विदेशी बँकांतील पद्धत अशी आहे. चेक वटविण्याकरितां आलेला खातेदार टेलरच्या समक्ष चेकवर (ट्रॅव्हलर्स चेकप्रमाणें) सही करतो, आणि तो टेलरच्या स्वाधीन करतो. चेक तपासून पाहून टेलर तो चेक आपल्या मागील ट्रेमध्यें टाकतो. टेलरच्या मागेंच बसलेला लेजरकीपर, जवळच्या इंडेक्सिंग कॅबिनेटमधील कार्डावरून शिल्लक तपासून पहातो. तोवर, टेलरनें जरूर तेवढी रक्कम मोजून तयार ठेवलेली असते. प्रत्यक्ष रक्कम घेतेवेळीं गिऱ्हाइकाला चेकवर पुनः एकदा सही करावी लागते. दोन्ही सह्या जमल्या, म्हणजे तात्काळ रक्कम दिली जाते.

अशा रीतीनें, लेजरकीपर, पासिंग ऑफिसर आणि कॅशिअर ह्यांचीं कामें कमी केलीं जातात; एकाच कामांत तीं सर्व कामें होतात. टोकन देणें व परत घेणें जरूर नसतें. विदेशी बँकांत, येथें व परदेशांतहि ही सोईस्कर पद्धत रूढ आहे. बँकेच्या स्टाफला गिऱ्हाइकें माहीत असणें आणि प्रत्येक खात्यांतील किमान आवश्यक रक्कम पुरेशी मोठी असणें, ह्या दोन गोष्टी टेलर पद्धतीच्या यशाला पोषक होतात. वेगवेगळ्या गिऱ्हाइकांसाठी वेगवेगळ्या रकमांच्या मर्यादा टेलरला घालून दिलेल्या असतात; त्या मर्यादेपर्यंतच्या चेकची रक्कम अशा रीतीनें सोइस्करपणें गिऱ्हाइकांना मिळूं शकते.

टेलर पद्धतीचा अवलंब करणाऱ्या कांहीं बँकांतून, सेव्हिंग्ज बँक लेजरच्या पानावरच नमुन्याची सही चिकटवलेली असते. किमान रक्कम थोडीच असल्यामुळें फारसा धोका अनुभवास येत नाहीं.

'टेलर' पद्धतीला खालील गोष्टींची आवश्यकता आहे: (१) कौंटरवर अनुभवी वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं बसायला हवे. (२) हिशोबाचे लेजर कागद किंवा सुटी कार्डें असायला हवीत. (३) मोठ्या बँकांतून गिऱ्हाइकांशीं व्यक्तिगत संबंध अशक्य असल्यामुळें आणि गिऱ्हाइकांची संख्या मोठी असल्यामुळें, कांहीं धोका पत्करण्याची बँकेची तयारी हवी. सध्यां बहुतेक सर्व बँकांतून नव्या, कमी अनुभवाच्या, कनिष्ठ नोकरांना कौंटरवर बसविलें जातें; वरिष्ठ अधिकारी देखरेख करतात. टेलर पद्धतीची अंमलबजावणी यशस्वी करायची, तर वरिष्ठ नोकरांचा दृष्टिकोण बदलायला हवा. ही गोष्ट सोपी नाहीं; बदलाला सहसा कुणी तयार नसतो.

सुट्या पानांची लेजर्स असलेल्या हिशेबाच्या वह्या इष्ट नाहींत, त्यामुळें निष्काळजीपणा अथवा बुद्धिपुरःसर दुर्लक्ष ह्यास वाव मिळतो आणि नुकसानीची शक्यता असते, असें कित्येक अनुभवी बँकर्सचें मत आहे. 'टेलर' पद्धत सुरू करायची म्हटली, तर इतरहि कित्येक बदल करावे लागतील.

'टेलर' पद्धतीमधील धोका पत्करण्यापेक्षा इतर मार्गें सुधारणा घडवून आणण्याचा कांहीं बँका प्रयत्न करीत आहेत. उदाहरणार्थ, मुंबईमधील एका विख्यात बँकेनें कौंटरमागील व्यवस्था बदलली आहे आणि त्यामुळें कांहीं मिनिटांतच आपण गिऱ्हाइकांना पैसे देऊं शकतो असें तिचें म्हणणें आहे. परंतु फारच थोड्या बँकांना हें शक्य आहे; कारण कौंटरची फेररचना करण्याजोगी त्यांचेजवळ पुरेशी जागाच नाहीं. स्टेट बँकेच्या मुंबईच्या कचेरींत तर फारच गर्दी आहे. मुंबईमधील एका बँकेनें लेजरकीपर पासून कॅशिअरकडे चेक पाठवण्यासाठी फिरता पट्टा ठेवला आहे; त्यावरून चेक आपोआप जातो; शिपायांनीं प्रत्यक्ष नेऊन देण्याला लागणारा वेळ त्यामुळें वाचतो. कांहीं बँका 'ड्राइव्ह-इन' बँकिंगचीं स्वप्नें रंगवीत आहेत. पण त्यांचा उपयोग मोठ्या मोटरवाल्या बड्या गिऱ्हाइकांनाच होणार. आपल्या ठेवींपैकी थोडीशी रक्कम काढूं इच्छिणाऱ्या सामान्य खातेदारांना लहान बँकांच्या कचेरींतहि अर्धा तास तरी थांबावे लागते; तो विलंब कसा दूर करतां येईल, हा खरा प्रश्न आहे.

---

## लोखंडाच्या खनिजाच्या निर्यातीसाठी सोय

विशाखापट्टम् बंदराच्या अंतर्भागांतील रेल्वेच्या वाहतुकीच्या सोयी वाढविण्याच्या कामांत चांगली प्रगति करण्यांत येत आहे. रेल्वेबोर्डातर्फे ह्या भागांत रेल्वेमार्गांचें छोटेंसें जाळेंच पसरण्यांत येत आहे. एकूण तीन नवे रेल्वेमार्ग बांधण्यांत यावयाचे आहेत. त्यांपैकी दोन बांधून पूर्ण झाले असून मालाच्या वाहतुकीसाठी खुलेहि करण्यांत आले आहेत. आणखी एखाद्या महिन्याभरांतच ह्या मार्गावरून प्रवासी वाहतूकहि सुरू करण्यांत येईल. ह्या तीन रेल्वेमार्गांना मिळून ७६ कोटी रुपये खर्च येणार असून त्यांची लांबी सुमारें ४१९ मैल इतकी होईल. लोखंडाच्या खनिजाची माती वाहून नेण्यासाठी ह्या रेल्वेमार्गांची योजना मुख्यतः करण्यांत आलेली आहे. ओरिसा आणि मध्यप्रदेशांतील राज्यांत सापडणारें लोखंडाचें खनिज जपानला निर्यात करण्यांत येणार आहे. दरसाल सुमारें ६० लाख टन खनिज जपानला पाठविलें जाईल असा अंदाज आहे. खनिजाच्या वाहतुकीसाठी बांधण्यांत आलेल्या नव्या रेल्वेरस्त्यांच्या साह्यानें ९० लाख टन खनिजाची वाहतूक करण्याची सोय होईल. १९६६ च्या आरंभीं सर्व रेल्वेमार्ग पूर्णपणें बांधून व्हावयाचे आहेत. कारण त्यानंतर सहा महिन्यांनीं जपानकडील निर्यातीचा प्रारंभ होणार आहे. जपानला करण्यांत यावयाच्या निर्यातीमुळें भारताला परदेशीय चलनाचा लाभ तर होईलच. पण त्याशिवाय विशाखापट्टम् बंदराच्या मागील भागाचा आर्थिक विकास होण्यासहि मदत होईल. या भागांतील लाकूड आणि इतर जंगलमाल बाजारपेठांत नेणें सुलभ होईल. नवे रेल्वेमार्ग आर्थिक दृष्ट्या फायद्याचे ठरण्याची अपेक्षा आहे. गुंतविलेल्या भांडवलांवर ७ टक्के नफ्याची शक्यता आहे.

## रस्तेबांधणीची गति कायम ठेवली पाहिजे

इंडिअन रोड कॉंग्रेसचें २७ वें अधिवेशन चंदीगड येथें भरविण्यांत आलें होतें. ह्या संघटनेचे अध्यक्ष श्री. दिवाण आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले कीं, भारताच्या सध्याच्या गरजा लक्षांत घेऊन रस्तेबांधणीच्या कामाची गति कायम ठेवण्यांत आली पाहिजे. कारण देशाची अर्थव्यवस्था, तिचा विकास आणि संरक्षण ह्या सर्वच बाबी रस्त्यांच्या कार्यक्षम व द्रुतगतीच्या बांधणीवर अवलंबून आहेत. इंडिअन रोड कॉंग्रेस ही संस्था रस्त्यांच्या बांधणीचें आणि त्यांच्या सुव्यवस्थेचें शास्त्र अधिक विकास पावावें म्हणून प्रयत्न करणारी आहे; ह्या बाबतींत संघटनेनें आजपर्यंत चांगलें कार्य केलेलें असून पुढेंहि तें तसेंच चालविण्यांत येईल असा विश्वास वाटण्यास हरकत नाहीं. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत रस्त्यांच्या बांधणीला बरेंच महत्त्व देण्यांत आलेलें आहे. कारण, वाहतुकीच्या चांगल्या साधनांपैकीं रस्ते हें एक प्रमुख साधन आहे. हें लक्षांत घेऊन तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ३०० मैल लांबीचे रस्ते केवळ मोठ्या रस्त्यांमधील दुवे जुळविण्यासाठीं बांधण्यांत यावयाचे आहेत. त्याशिवाय २,५०० मैल लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करण्यांत यावयाची असून ८५ मोठ्या पुलांचीं कामें पार पाडण्यांत येणार आहेत. हा सर्व कार्यक्रम पार पाडण्यांत आला म्हणजे रस्त्यांवरील वाहतुकीच्या मार्गांतील अनेक ठिकाणच्या अडचणी नाहींशा अगर कमी होतील. शिवाय सध्यांच्या आणीबाणीच्या परिस्थितींत लष्करी दृष्टीनेंहि रस्त्यांच्या विकासाची अतिशय जरूरी आहे. तात्पर्य, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील रस्त्यांच्या विकासाचा कार्यक्रम हा अनेक उद्देश एकाच वेळीं साध्य करणारा आहे.

## जपानी छोट्या यांत्रिक नांगरांची आयात

शेतजमिनींच्या छोट्या तुकड्यांची मशागत यांत्रिक रीतीनें करण्याचें काम कांहींसें अवघड असतें. कारण, अशा छोट्या शेतांसाठीं लागणारी यंत्रसामग्री भारतांत उपलब्ध नाहीं. त्यामुळें ह्या शेतांची उत्पादनक्षमता वाढणें कठीण जाते. जपानमध्यें अशा प्रकारची यंत्रसामग्री उपलब्ध असून त्यांत एक छोटा शक्तिचलित नांगरहि आहे. जपानकडून असे १,००० नांगर आयात करण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. अशा प्रकारची यंत्रसामग्री आयात करण्यास ४८ लाख रुपयांचें परदेशीय चलन लागणार आहे. जपाननें भारताला दिलेल्या येनच्या कर्जांतून नांगरांची किंमत चुकती करण्यांत यावयाची आहे. ज्या जपानी कंपनीकडून हे नांगर आयात करण्यांत यावयाचे आहेत तिनें ओरिसा, बिहार, पश्चिम बंगाल आणि गुजरात राज्यांत यंत्रसामग्री वापरणारी छोटीं शेतें नमुन्यादाखल चालविलीं आहेत. छोट्या यांत्रिक नांगरांच्या साह्यानें जमीन नांगरण्यांत आल्यास नांगरट अधिक लवकर आणि चांगली होईल असा दावा करण्यांत येत आहे. कारण, जपानी नांगरांचा फाळ नेहमींच्या फाळापेक्षा अधिक रुंद असतो. ह्या नांगराची व त्याला लागणाऱ्या आनुषंगिक उपकरणाची किंमत सुमारें ५ हजार रुपयांच्या आसपास असेल. शक्य तर नांगरांची निर्मिति जपानी कंपनीच्या सहकार्यानें भारतांत करण्याची खटपट चालू आहे. नांगरांची निर्मिति भारतांत होऊं लागण्यापूर्वी जपानकडून आयात करण्यांत आलेल्या नांगरांचा उपयोग कसा काय होतो तेंहि समजून येईल. हैदराबादमधील एका कंपनीला नांगरनिर्मितीचा कारखाना काढण्याचा परवाना देण्यांत आला आहे. नांगराच्या आयातीसाठीं सरकारकडून परदेशीय चलन मंजूर होईल अशी अपेक्षा आहे.

## ब्रिटनकडील निर्यातींत वाढ झाली.

भारताकडून ब्रिटनला करण्यांत येणाऱ्या मालाच्या निर्यातींत वाढ झालेली आहे. १९६३ च्या जानेवारी ते सप्टेंबर ह्या नऊ महिन्यांच्या कालांत मागील वर्षाच्या ह्याच कालांतील निर्यातीच्या मानानें बरीच वाढ झालेली आढळून आली. १९६२ च्या पहिल्या नऊ महिन्यांत ब्रिटननें ९.५८ कोटी पौंड किंमतीचा माल भारताकडून आयात केला होता. १९६३ च्या पहिल्या नऊ महिन्यांत ९.९९ कोटी पौंडांचा माल आयात करण्यांत आला. निर्यात केलेल्या मालांत चहा, कापड आणि सूत ह्या मालाची निर्यात इतर मालापेक्षा सर्वांत अधिक झालेली आहे. १९६२ च्या जानेवारी ते सप्टेंबर ह्या कालांत भारतानें ब्रिटनला ३.६ कोटी पौंड किंमतीचा चहा निर्यात केला. १९६३ च्या पहिल्या नऊ महिन्यांत ३.८० कोटी पौंड किंमतीचा चहा निर्यात करण्यांत आला. कापड आणि सूत ह्यांच्या निर्यातींतहि ह्याच कालावधींत वाढ झाली. १९६२ सालीं १.५७ कोटी पौंडांचे व १९६३ सालीं १.७१ कोटी पौंडांचें कापड व सूत निर्यात करण्यांत आले. दोन्ही वर्षांच्या ह्याच कालावधींत ब्रिटननें भारताला केलेल्या मालांतहि वाढ झालेली आहे. १९६२ सालीं ८.६ कोटी पौंड किंमतीच्या मालाची निर्यात करण्यांत आली होती. १९६३ सालचा निर्यातीचा आंकडा १० कोटी पौंडांपेक्षाहि थोडा अधिक आहे. ब्रिटननें केलेल्या निर्यातींत अधिकांश भाग सर्वसाधारण यंत्रसामग्रीचा व विजेच्या यंत्रसामग्रीचा आहे. १९६२ सालीं भारतानें ८७ लाख पौंड किंमतीची विजेची यंत्रसामग्री विकत घेतली होती. १९६३ सालच्या पहिल्या नऊ महिन्यांत भारतानें १.४ कोटी पौंड किंमतीची विजेची यंत्रसामग्री आयात केलेली आहे. ब्रिटनकडून भारताला निर्यात करण्यांत आलेल्या लोखंडांत व पोलादांतहि थोडीशी वाढ झालेली आहे.

## भद्रावती कारखान्याला परदेशीय मदत

म्हैसूर राज्यांतील भद्रावती आयर्न ॲन्ड स्टील वर्क्स आणि ऑस्ट्रियांतील बोल्हर आणि कंपनी ह्यांच्यांत एक करार करण्यांत आला आहे. ह्या कारखान्यांत कांहीं विशेष प्रकारचे पोलाद तयार करण्यासाठीं लागणाऱ्या तंत्रज्ञांना शिक्षण देण्यांत येणार आहे. तंत्रज्ञ शिकवून तयार करण्याचें काम ऑस्ट्रियन कंपनीनें आपल्या अंगावर घेतलें आहे. तंत्रज्ञ शिकवून तयार करण्यासाठीं २.५ कोटी रुपये परदेशीय चलनांच्या रूपांत खर्च करावें लागणार आहेत. कारखान्यांत खास प्रकारचे पोलाद करण्यासाठीं नवी यंत्रसामग्री बसवावी लागेल. त्यासाठीं १३ कोटी रुपये खर्च येणार असून भद्रावती कारखान्याचा विस्तार करण्यासाठीं आणखी ७ कोटी रुपये लागणार आहेत. सध्यां कांहीं प्रकारचें विशिष्ट पोलाद परदेशांतून आयात करण्यांत येतें. भद्रावती कारखान्यांत हें पोलाद तयार करण्यास दोन वर्षांचा अवधि लागेल. उत्पादन सुरू झाल्यावर दरसाल ७७हजार टन विशेष प्रकारचें पोलाद तयार होऊं लागेल, आणि परदेशीय चलनाच्या खर्चांत बचत होऊं लागेल.

## मोटार वाहतुकीचें राष्ट्रीयीकरण

मध्यप्रदेश सरकारनें राज्यांतील मोटार वाहतुकीचें राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रीयीकरण करण्याचा कार्यक्रम ४ वर्षांत पूर्ण करण्यांत येणार आहे. दरम्यान ५२ मार्गांवरील मोटारींची वाहतूक सरकार ताब्यांत घेणार आहे. त्यापैकीं ४५ मार्गांवरील वाहतूक १ मार्च, १९६४ पासून सरकारच्या अखत्यारींत जाणार असून बाकीचे सात मार्ग १ एप्रिलपासून सरकार आपल्या ताब्यांत घेईल. सध्यां ह्या मार्गांवर सुमारें १०० प्रवासी मोटारी धांवत असतात. मोटार कंपन्यांचे परवाने रद्द करण्यांत येतील.

अमेरिकन व युरोपियन

## वेगवेगळया बँकांचीं वैचित्र्यें

### ( एका प्रवाशाचें अवलोकन )

सॉओ पॉलो ( ब्रॅझील ) येथील कित्येक बँकांच्या मॅनेजरांशीं मी रस्त्यावरूनच बोलूं शकलों; त्या बँकांना खिडक्या-दरवाजेच नव्हेत; मॅनेजरांचीं टेबलें रस्त्यावरच होतीं, म्हणाना !

लंडनच्या विमानतळावर ब्रिटनच्या पांच प्रमुख बँकांच्या शाखा आहेत; त्या चोवीस तास उघड्या असतात.

डलास ( टेक्सस ) मधील नॅशनल बँकेंत मी २५ डॉलर्सचें सेव्हिंग्ज खातें उघडलें, तेव्हां मला चांदीच्या मुलाम्याचा टी सेट बक्षीस मिळाला.

गुंतवणूक किंवा भेटीची वस्तु ह्या दृष्टीनें सोन्याचीं नाणीं पश्चिम युरोपांत लोकप्रिय होत आहेत. वेगवेगळया देशांचीं १४ नाणीं पादचाऱ्यांनाहि पाहतां यावींत, म्हणून भिंगांची योजना जर्मनींतील कांहीं बँकांनीं केली आहे. कांहीं स्विस बँकांनीं सोन्याच्या नाण्यांच्या व्यवहारासाठी खास नोकरवर्ग नेमला आहे. कित्येक बँका सोन्याच्या नाण्यांचे सचित्र कॅटलॉग प्रसिद्ध करतात.

कुणालाहि टेलिफोन करतां यावा, ह्यासाठी कॅरॅकस (वेनेझुवेला) येथील बँको डेल कॅरिबीनें भिंतीला टेलिफोन लावून ठेवले आहेत. डोंगराळ मुलुखांत टेलिफोनचें दळणवळण सुलभ नसल्यामुळें, बँकेनें स्वतःची खासगी रेडिओ टेलिफोनची व्यवस्था केली आहे.

चेक लिहिण्याच्या टेबलावरील कांचेखालीं रॉयल बँक ऑफ कॅनडाच्या कॅरॅकस शाखेनें त्या शहराच्या रस्त्यांचे नकाशे ठेवले आहेत.

सर्व प्रमुख ब्रिटिश बँकांतून चांदीचीं व तांब्याचीं नाणीं वजन करण्याचे कांटे आहेत. मिडलंड बँकेंतील वजनांचे कांटे अगदीं अद्ययावत् आहेत. त्यावर चलनी नोटा सुद्धां बिनचूक वजन करून घेतां येतात. कांट्यावरील आंकडा नोटांची संख्या दर्शवितो. ह्या प्रकारच्या कांट्यांमुळें पैसा मोजावा लागतच नाहीं.

वेस्ट इंडीजमधील मार्टिनिक ह्या फ्रेंच बेटांत क्रेडिट मार्टिनिकी ह्या फ्रेंच बँकेची फोर्टे द्-फ्रान्स ह्या राजधानींत मुख्य कचेरी आहे. ह्या बँकेच्या ठराविक ठिकाणीं कोठेंहि शाखा नाहींत; पण मुख्य कचेरींतून फिरत्या गाड्या गांवांगांवांतून पाठविण्यांत येतात प्रत्येक ठिकाणीं तीन तास मुक्काम करून त्या गाड्या संध्याकाळीं मुख्य कचेरींत परत येतात.

यात्रांचे वेळीं, ब्रिटनमधील मार्टिन्स बँक ट्रेलर्सचा उपयोग करते. वर्षभरांत, कोणत्या वेगवेगळया प्रदर्शनांच्या जागीं अशी ट्रेलर्स पाठविलीं जातील, तें आधींच पुस्तिकेंत नमूद केलेलें असतें.

उतारूंशीं व्यवहार करून प्रवासाला उत्तेजन देणें, ह युरोपियन बँकांचें वैशिष्ट्य आहे. " आज जा; सावकाश पैसे द्या. " अशा स्वरूपाच्या प्रमुख जर्मन बँकांच्या योजना असतात. ऑस्ट्रिया, प. जर्मनी, स्वित्झरलंड आणि इटली येथील बँकांतून परदेशी उतारूंना मदत करण्यासाठी खास दालनें आहेत; बहुभाषिक नोकरांची त्यासाठी योजना केलेली असते. १४५९ मध्यें स्थापन झालेल्या बँकोद् सिसिलीमध्यें उतारूंना इटलीमधील वेगवेगळया शहरांचे नकाशे व माहितीपत्रकें पुरविलीं जातात. क्रेडिटो इटालियॅनोमध्येंहि अशी व्यवस्था आहे.

युरोपियन उतारूंच्या सोईसाठी हुंडणावळीचे ताजे दर बँकांच्या खिडक्यांतून लावलेले असतात. त्यांतील प्रत्येक देशाचें नांव त्या देशाच्या भाषेंत लिहिलेलें असतें, इतकेंच नव्हे तर त्यावर त्या देशाचें निशाणहि लावलेलें असतें. बहुतेक बँका हुंडणावळीच्या दरांचीं कोष्टकें नेहमींच उपलब्ध करतात.

बँकांच्या कामाचे तास प्रत्येक देशांत वेगळे आढळतात. मध्य युरोपांतील बँका दुपारीं १२ ते २ बंद असतात. कांहीं बँका ४ पर्यंत बंद असतात. कॅरिबिअन प्रदेशांत बँका फक्त सकाळीं ८ ते दुपारीं १२ उघड्या असतात. त्यानंतर बँकांचा नोकरवर्ग अंतर्गत काम करतो. कांहीं झालें तरी दुपारीं ४ च्या पुढें बँकेचे दरवाजे खुले नसतात. ६ वाजतां सूर्यास्त होतो.

ड्राइव्ह-इन आणि वॉक अप टेलर विकेटसूचा प्रसार झपाट्यानें होत आहे.

इक्वेडॉरमधील एका बँकेंत ठेवीदारांचीं नांवें लॉटरींत काढलीं जातात; यशस्वी नांव येणाराला त्याच्या मुलाच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ति मिळते.

स्वित्झर्लंड, युरुग्वे, इत्यादि देशांतील बँकांतून गुप्त ठेवी ठेवतां येतात. अशा ठेवींचें अस्तित्व, त्यांतील रक्कम, ठेवीदाराचें नांव, हें बँकेकडून कुणालाहि कळूं शकत नाहीं. संचित धन आर्थिक व्यवहारांना त्यामुळें उपलब्ध होतें.

इक्वेडॉरमधील एका बँकेंतील प्रत्येक नोकराला दररोज सकाळीं एक केळें खाण्याला दिलें जातें. केळ्यांचा अन्नांत अधिक उपयोग केला जावा, ह्याचा तो प्रचार आहे.

रोममधील मॅांटे द् पॅशि द सीना ही बँक १६२५मध्यें स्थापन झालेली आहे. तिच्या शाखांच्या इमारती अगदीं आधुनिक आहेत. पण मुख्य कचेरीच्या इमारती म्हणजे १५ व्या शतकांतील भव्य राजवाडे आहेत. सन ११०० पूर्वी स्थापन झालेल्या सीना इस्पितळाचा बराच मोठा खर्च ह्या बँकेमार्फत केला जातो. मूळ इमारतीमध्येंच अद्याप हें इस्पितळ आहे; त्यांतील वॉर्डच्या छपरावर जुनी दुर्मीळ चित्रें आहेत.

---

### तेलापासून होणाऱ्या पदार्थांचें उत्पादन

चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारतांत खनिज तेलापासून तयार करण्यांत येणारे २.५ कोटी टन वजनाचे पदार्थ उत्पादन करतां येतील अशी माहिती खाणी व इंधन खात्याचे मंत्री श्री. अलगेशन ह्यांनीं सांगितली आहे. पण त्या सुमारास ह्या पदार्थांचा खपही २.७ ते ३ कोटी टनापर्यंत वाढेल असा अंदाज आहे. सध्यां भारतांत ७८ लाख टन तेलजन्य पदार्थ तयार करण्यांत येतात. गरजेच्या मानानें हें उत्पादन २० लाख टनांनी कमी पडते.

---

### गर्भावस्थेंतील मुलाला रक्तदान

न्यूझीलंडमधील ऑकलंड शहरांतील डॉक्टरांनीं गर्भावस्थेंत असणाऱ्या एका बालकाला रक्तदान करून त्याला वांचविलें आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न असून तो यशस्वी झाल्याचे सांगण्यांत येत आहे. आणखी अशा तऱ्हेचे बरेच प्रयोग करण्याची संधि मिळाल्याशिवाय ह्या प्रयत्नांचे यश निश्चित सांगतां येणार नाहीं. परंतु अगदीं आवश्यक अशा प्रसंगीं गर्भांतील मूल वांचविण्याची नवी दिशा मात्र उपलब्ध झाली आहे, असें मानलें जात आहे.

---

### साक्षरता : भारत व जपान

भारतांतील साक्षरतेचें प्रमाण २४.०२% आहे. साक्षरतेची व्याख्या फार सवलतीची आहे, फक्त स्वतःचें नांव लिहूं शकणारेहि साक्षर म्हणून नोंदले जातात. जपानमधील साक्षरतेचें प्रमाण सबंध जगांत जास्त आहे. तेथील ९८.५% लोक साक्षर आहेत. जपानी लोक अतिशय शिस्तबद्ध आणि उद्योगी आहेत, हें सुप्रसिद्ध आहे.

## रक्तदानाचा धंदा करणारांचा संप

मुंबईमधील 'रक्तदान' करणाऱ्या सुमारें चार हजार 'दात्यांनीं' संप पुकारल्यामुळें तेथील इस्पितळांतून रक्तांतरासाठी लागणाऱ्या रक्ताचा तुटवडा पडला होता आणि अगदीं जरूरीच्या शस्त्रक्रियांनाच रक्त उपलब्ध होऊं शकलें. " प्रत्येक २५० सी. सी. रक्ताला खासगी इस्पितळें १३ ते ३० रुपये देतात. पण रुग्णांना ते १५० रुपयांपर्यंत किंमतीला विकण्यांत येतें. सरकारी इस्पितळांनीं आपला दर १० रुपयांचा १५ रुपये करावा " अशी संपवाल्याची मागणी होती. सर्व जिनसांच्या किंमती वाढल्या असतांना मानवी रक्ताची किंमत मात्र कमीच राहिली आहे. रक्त- 'दानावरच' जगणारे कित्येक लोक आहेत. त्यावर दरमहा त्यांना ५० ते ६० रुपये मिळूं शकतात. धंदा चांगला चालला तर कमाई दरमहा १०० रु. पर्यंतहि होते. कुणालाहि महिन्यांतून फक्त एकदाच आपलें रक्त देतां येतें, असा नियम आहे. सुमारें ५० ठिकाणीं रक्त विकत घेण्याची व्यवस्था आहे. तेथें प्रत्येक दात्याची नोंद असते. परंतु दुसऱ्या केंद्रांत जाऊन रक्त दिलें तर तें उघडकीस येऊं शकत नाहीं. वेगवेगळ्या केंद्रांत जाऊन दरमहा १,००० सी सी. रक्त देणारे कित्येक जण आहेत. रक्तदान करणारांची युनियन नसल्यामुळें त्यांचा संप तडीस जाणें कठीण झालें आणि कोणाकडूनहि कसलेंहि आश्वासन न मिळतां संप बंद पडला.

## अणुशक्तीच्या साह्यानें भ्रमण करणारा उपग्रह

अमेरिकेनें अणुशक्तीच्या साह्यानें पृथ्वीभोंवतीं भ्रमण करणारा उपग्रह सोडण्यांत यश मिळविलें आहे. ह्या उपग्रहापासून पृथ्वीवर संदेशही येऊं लागले आहेत. उपग्रहाला गति देण्याचें काम अणुशक्तीवर चालणाऱ्या एका जनरेटरकडून करण्यांत येत आहे. हा जनरेटर १२ किलोग्रॅम वजनाचा आहे. त्याची लांबी २५ सेंटिमीटर आणि व्यास ५० सेंटिमीटर आहे. तो आपलें काम ५ वर्षे करील अशी शास्त्रज्ञांची अपेक्षा आहे. उपग्रह पृथ्वीपासून किती अंतरावर फिरत आहे त्याची माहिती जाहीर करण्यांत आलेली नाहीं. परंतु तो निदान ९०० वर्षे तरी प्रदक्षिणा करीत राहील असा अंदाज करण्यांत आला आहे.

---

## रशियांतील सामुदायिक शेती

रशियांतील कित्येक सरकारी मालकीच्या व सामुदायिक मालकीच्या शेतवाड्या उत्पादनाच्या बाबतींत अजूनहि रखडत असल्याची टीका करण्यांत येत आहे. ह्या वाड्यावर काम करणारे लोक आपल्या खाजगी मालकीच्या शेतजमिनींत अधिक राबतात व वाडीच्या शेतीकडे दुर्लक्ष करतात, असें आढळून आलें आहे.

## १९६२ मधील अग्रेसर १२ अमेरिकन कंपन्या

| अनुक्रम | कंपनी | मुख्य ठिकाण | उत्पादन | विक्री ( कोटी डॉलर्स ) | निवळ नफा ( कोटी डॉलर्स ) |
|---|---|---|---|---|---|
| १ | जनरल मोटर्स | डेट्रॉइट | मोटारी | १४६४ | १४६ |
| २ | स्टँडर्ड ऑइल | न्यूयॉर्क | पेट्रोल पदार्थ | ९५४ | ८४ |
| ३ | फोर्ड मोटर | डिअरबॉर्न | मोटारी | ८०९ | ४८ |
| ४ | जनरल इले. | न्यूयॉर्क | विजेचीं उपकरणें | ४७९ | २७ |
| ५ | सोकोनी | न्यूयॉर्क | पेट्रोल पदार्थ | ३९३ | २४ |
| ६ | यु. एस. स्टील | न्यूयॉर्क | पोलाद | ३४७ | १६ |
| ७ | टेक्सॅको | न्यूयॉर्क | पेट्रोल पदार्थ | ३२७ | ४८ |
| ८ | गल्फ ऑइल | पिट्सबर्ग | पेट्रोल पदार्थ | २८३ | ३४ |
| ९ | वेस्टर्न इलेक्ट्रिक | न्यूयॉर्क | विजेचीं उपकरणें | २७६ | १४ |
| १० | स्विफ्ट | शिकॅगो | अन्नपदार्थ | २४९ | २ |
| ११ | ड्युपाँट | विल्मिंगटन | रसायनें | २४४ | ४५ |
| १२ | क्राइस्लर | डेट्रॉइट | मोटारी | २३७ | ७ |

## १९६२ मधील अग्रेसर १२ अमेरिकेबाहेरील कंपन्या

| अनुक्रम | कंपनी | मुख्य ठिकाण | उत्पादन | विक्री ( कोटी डॉलर्स ) | निवळ नफा ( कोटी डॉलर्स ) |
|---|---|---|---|---|---|
| १ | रॉयल डच/शेल | नेदरलंड्स–ब्रिटन | पेट्रोल | ६०२ | ५७ |
| २ | युनिलिव्हर | ब्रिटन–नेदरलंड्स | अन्न, तेल, साबण | ४१३ | १४ |
| ३ | नॅशनल कोल बोर्ड | ब्रिटन | कोळसा | २४८ | ३ |
| ४ | ब्रिटिश पेट्रोलियम | ब्रिटन | पेट्रोल | २०१ | १९ |
| ५ | नेसल | स्वित्झरलंड | अन्नपदार्थ | १८३ | २ |
| ६ | इं. के. इंडस्ट्रीज | ब्रिटन | रसायनें, धातू | १६२ | १० |
| ७ | व्होल्क्स वॅगनवर्क | जर्मनी | मोटारी | १६० | ६ |
| ८ | फिलिप्स | नेदरलंड्स | विजेचीं उपकरणें | १५३ | ९ |
| ९ | सिमेन्स | जर्मनी | विजेचीं उपकरणें | १३५ | ४ |
| १० | फायट | इटली | मोटारी, यंत्रें | १२६ | २३ |
| ११ | डॅम्लर बेंझ | जर्मनी | मोटारी | ११८ | ५ |
| १२ | क्रुप | जर्मनी | लोखंड, पोलाद, यंत्रें | १०४ | उपलब्ध नाहीं. |

### यंदा बद्रीनाथची यात्रा कमी झाली

१०,२०० फूट उंचीवरील बद्रिनाथ मंदिर २५ नोव्हेंबर पासून बंद ठेवण्यांत आलें आहे. ११,७५० फूट उंचीवरील केदारनाथ मंदिर १८ नोव्हेंबरपासून बंद आहे. थंडी संपल्यावर, सहा महिन्यांनीं तीं पुनः खुलीं केलीं जातील. मंदिराच्या आसपास रहाणारे लोक खालीं कमी थंडीच्या प्रदेशांत रहावयास गेले आहेत. यंदा ३५,००० लोकांनीं बद्रिनाथाची यात्रा केली; गेल्या वर्षी ५९,००० यात्रेकरू होते.

### गुजरातमध्यें खताचा कारखाना

गुजरात राज्यांत कोयाली येथें १५ कोटी रुपये खर्चून एक खताचा कारखाना स्थापन करण्यांत येणार आहे. कारखान्याला लागणाऱ्या भांडवलापैकीं ७·५०' कोटी रुपये भांडवल गुजरात सरकार घालणार असून बाकीचें भांडवल आयुर्विमा कॉर्पोरेशन आणि व्यापारी बँका उभारणार आहेत. गुजरातच्या शेतकऱ्यांना २ कोटी रुपयांचें भाग भांडवल सहकारी बँकांमार्फत विकण्यांत येणार आहे. कारखाना उभारण्याचें काम बहुधा एका जपानी कंपनीकडे सोंपविलें जाईल.

### परदेशी चलनांत कर्जें

आवश्यक आयात मालाची किंमत देण्यासाठी आपल्या कांहीं गिऱ्हाइकांना स्टेट बँक ऑफ इंडियानें परदेशी हुंडणावळींत कर्जें मिळवून देण्यास मान्यता दिली आहे. कर्जदार पुढें जो माल तयार करून परदेशांत पाठवितील, त्यांतून कर्जाची परतफेड व्हावयाची आहे. अशा प्रत्येक व्यवहारास मध्यवर्ती सरकारची मान्यता घ्यावी लागेल.

### लेहमध्यें विजेची निर्मिती

लष्कराच्या एंजिनिअर्सनीं लेहमध्यें छोट्या प्रमाणावर वीज निर्माण करण्यांत यश मिळविलें आहे. १ किलोवॅट वीज निर्माण करणारें छोटें वीजकेंद्र उभारण्याच्या त्यांच्या खटपटीला यश आलें आहे. लेहच्या आसपास उंचीवरून खालीं पडणारे छोटेमोठे जल-प्रवाह बरेच आहेत. त्यांचा फायदा घेऊन व्यापारी प्रमाणावर वीज निर्माण करण्याचे प्रयत्न चालू आहेत. सूर्याच्या उष्णतेच्या साह्यानें अन्न शिजविण्याचे प्रयोगहि करण्यांत येत आहेत.

### परदेशीय चलनाच्या उत्पन्नांत वाढ

कलकत्ता बंदराचे मुख्य कंट्रोलर श्री. सेन ह्यांनीं दिलेल्या माहितीप्रमाणें निर्यातीमुळें मिळणाऱ्या परदेशीय चलनांत उत्तेजक वाढ दिसून येत आहे. गेल्या आठ महिन्यांच्या कालांत परदेशीय चलनाच्या साठ्यांत ७० कोटी रुपयांची भर पडलेली आहे. तथापि, आयातीसाठी लागणाऱ्या परदेशीय चलनांत आणि त्याच्या प्राप्तींत अद्यापहि बरीच तफावत आहे. त्यामुळें परदेशीय चलन हात राखून खर्च करण्याची आणि ते अधिक मोठ्या प्रमाणावर मिळविण्याची गरज मुळींच कमी झालेली नाहीं.

### बँक ऑफ अमेरिकेची मुंबईंत शाखा

रिझर्व्ह बँकेनें बँक ऑफ अमेरिकेला भारतांत बँकिंगचा व्यवसाय करण्यास परवाना दिला आहे. ही बँक भारतांतील पहिली शाखा मुंबई येथें सुरू करील.

### हिंदी फर्म्सचे परदेशांत कारखाने

आठ हिंदी फर्म्सना परदेशांत कारखाने काढण्यास परवानगी देण्यांत आली आहे. त्यांत सुमारें ५८·५० कोटी रुपये गुंततील.


# दि सरदार कारबोनिक गॅस कंपनी लि.

उत्पादक

**कारबोनिक ॲसिड गॅस**

**सुका बर्फ, सोडा वॉटर मशिनरी**

आणि

**खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते**

रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्टस्चें ऑफिस

सर विठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

फॅक्टरी ऑफिस : कॅनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८११

शाखा आणि फॅक्टरी

१ केडल रोड, दादर, फ्रिझाइट फॅक्टरी टे. ६२११९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी ( कँट ) टे. १०८
३ दिल्ली–रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०१
४ कलकत्ता–१०३ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७–२२४७
५ विजयवाडा–गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. १०४१
६ रावळपिंडी–डलहौसी रोड.

सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : 'कारबोनिक'

## नद्यांचें पाणी खराब करण्याविरुद्ध कायदा

औद्योगिक कारखान्यांतील उत्पादनांत कांहीं प्रमाणांत निरुपयोगी वस्तू तयार होतात. अशा वस्तू जवळच एखादी नदी असेल तर तींत सोडून देण्यांत येतात. त्यामुळें नदीचें पाणी खराब होऊन कारखान्याखाली असलेल्या गांवांना उपद्रव होतो. उत्पादनानंतर राहिलेले निरुपयोगी पदार्थ अशा रीतीनें नैसर्गिक पाण्यांत सोडण्यास मनाई करणाऱ्या कायद्याचा मसुदा मध्यवर्ती सरकारनें तयार केला असून तो राज्यसरकारांकडे मतप्रदर्शनासाठी पाठविला आहे. नैसर्गिक पाण्याची खराबी थांबविण्यासाठी कारभारविषयक व तांत्रिक उपायहि कायद्यांत सुचविण्यांत आले आहेत. नवे उद्योगधंदे काढतांना अशा पदार्थांची विल्हेवाट लावण्याकडे लक्ष देण्यांत यावें असेंहि सुचविण्यांत आलें आहे.

---

## किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं. लि.

वरील कंपनीनें ३० जून, १९६३ अखेर संपलेल्या वर्षीं ४·५७ कोटि रु. च्या उत्पादनाची विक्री केली. त्यापूर्वीच्या वर्षी ३·४७ कोटी रु. ची विक्री झाली होती. घसारा १३ ८४ लक्ष रु., मॅनेजिंग एजंटांचा मेहेनताना ६·१७ लक्ष रु., कर ४८·५० लक्ष रु., जनरल रिझर्व्ह ४·२४ लक्ष रु., डेव्हलपमेंट रिबेट रिझर्व्ह ४·१२ लक्ष रु., अशा तरतुदींनंतर ११·५९ लक्ष रु. निवळ नफा राहिला. डिव्हिडंड १२% चे १०% करण्यांत आले.

## इस्पितळांतील अर्भकांचें रक्षण

दिल्लीमधील इस्पितळांत जन्मास येणाऱ्या अर्भकाच्या सुरक्षिततेसाठी त्यांच्या पाठीवर, हातांवर व पायांवर खुणा करण्यांत येणार आहेत. मॅटर्निटी वॉर्डांत भेटावयास येणारांची संख्या नियंत्रित करणें, आईजवळच पाळण्यांत बालकें ठेवणें, रक्षणासाठी चौकीदार ठेवणें, इत्यादि उपायहि योजण्यांत येत आहेत.

---

## " नया पैसा " "पैसा" होणार

१९६४ च्या अखेर भारताचें सर्वांत लहान नाणें ' नया पैसे ' राहणार नाहीं. तें " पैसा " म्हणून ओळखलें जाईल.

---

## ला. इं. कॉर्पोरेशनचें अंडररायटिंग

३१ मार्च, १९६३ अखेरच्या १५ महिन्यांत लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें २५ कंपन्यांच्या भागांच्या अंडररायटिंगमध्यें भाग घेतला. त्या सर्वांच्या भागांची दर्शनी किंमत १९०–२३ कोटी रु. होती.

---

## लक्ष्मी बँकेच्या ठेवीदारांना काय मिळालें !


लक्ष्मी बँकेच्या ठेवीदारांना ३० सप्टेंबर, १९६३ अखेर रुपयांत दोन आणे वाटण्यांत आले. लिक्विडेशनचा खर्च ७·२३ लक्ष रु. झाला.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई–४. [ टेलिफोन ७२१००
बचतीच्या आकर्षक योजना
( १ ) स्पेशल सेव्हिंग व्याजाचा दर ३॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत " ३। "
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें " ५ "
मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
वसूल भांडवल रु. ९·८३ लाख
रिझर्व्ह व इतर फंडस् रु. ११·३३ "
ठेवी रु. ३५९·९२ "
खेळतें भांडवल रु. ३९४·५२ "
शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.

स्थापना १९१८
AICO

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.